१०रु. COURT FEE Rs.10
26 FEB 2018
दस रुपये TEN RUPEES

स.प.
३२६६
२८/२/१८
सचिव

दि. २८/०२/२०१८

# जोडपत्र " अ "

## (नियम ३ पहा)

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वय माहिती मिळविण्या बाबत अर्ज

नगरसचिव विभाग
स.प./न.प./अ.प./आ.क्र २८/२८
दिनांक :- २८/२/१८

**प्रति:** मा नगर सचिव सो
मिरा- भाईंदर महानगरपालिका

**अर्जदार :** ईमरान इब्राहीम शेख
सदनिका क्र . ३०३ - अे-१ सेक्टर ७
शांतीनगार मिरा रोड ( पू) जि. ता.
ठाणे, ४००११०७

**मोबाइल नंबर:९८७०१६४४७४**
**Email.djimrann@jmail.com**

**महोदय:**

नमूद केलेला दस्तऐवज आणि दस्तऐवज ची तपासणी मिळने बाबत विनंती .

१) महासभा ठराव क्र.१५०. दि.२४/०२/१९८६

२) महासभा ठराव क्र.३४२. दि.०९/१०/१९९०

३) महासभा प्रकरण क्र.१०६,ठराव क्र.७६. दि.१५/१०/२०१५.

४) महासभा प्रकरण क्र.१३२,ठराव क्र.१००. दि.१८/०१/२०१६.

५) महासभा प्रकरण क्र.१०६,ठराव क्र.७६. दि.१५/१०/२०१५.अन्वेय अधिसूचना क्र.टिपीएस-१२९६ ८४७/प्र.क्र.१६२/९६/नवि-१२, दि.१४/०५/१९९७

६) पत्र क्र.मनपा/आयुक्त/१००/२०१५-१६, दि.११/०१/२०१६

७) वियो-मिरा भाईनदर मनपा/न.रअधिकरी/नेमणूक/सहसकोवि/३२०

व संबंधित दस्तऐवज आणि दस्तऐवज ची तपासणी मिळने बाबत विनंती .

माहिती स्वता घेऊन जाण

Imran
अर्ज दार स्वाक्षरी

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग


जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./२८/2018 दिनांक :- ०६/०३/2018

**प्रति,**
श्री. ईमरान इब्राहीम शेख
सदनिका क्र. 303-अे-1
सेक्टर 7, शांतीनगर,
मिरारोड (पू.)

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.
माहिती मिळणे बाबत.

संदर्भ :- आपणांकडील दि. 28/02/2018 **रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये, आपण मुद्दा क्र. 1 ते 4 अन्वये मा. महासभा दि. 24/02/1986, ठराव क्र. 150, मा. महासभा दि. 09/10/1990, ठराव क्र. 342, मा. महासभा दि. 15/10/2015 प्रकरण क्र. 106, ठराव क्र. 76 व मा. महासभा दि. 18/01/2016 प्रकरण क्र. 132, ठराव क्र. 100 या ठरावाच्या सत्यप्रतींची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने आपणांस या ठरावाच्या सत्यप्रती उपलब्ध करुन देत आहोत. (एकुण पाने 05)

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा प्र. नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल करता येईल.

कळावे.

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

pc 2\\User001\d\Mahiti Adhikar\Letter - Imran Shekh.docx

01C

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ 26 /2018 दिनांक :- 26 / 2 /2018

प्रति,
जनमाहिती अधिकारी,
नगररचना विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.
माहिती मिळणेबाबत.

संदर्भ :- श्री. ईमरान इब्राहीम शेख यांचेकडील दि. 28/02/2018 **रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

अर्जदार श्री. ईमरान इब्राहीम शेख यांच्या पत्रामधील नमुद मुद्दा क्र. 5 ते 7 नगररचना विभागाशी निगडीत असल्याने, संदर्भित अर्जाची छायांकित प्रत आपणांकडे वर्ग करण्यांत येत आहे. तरी कृपया अर्जदारांस मुद्दा क्र. 5 ते 7 ची माहिती आपणांमार्फत मुदतीत परस्पर देण्यांत यावी.

कळावे.

26/2/18

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

**प्रत माहितीस्तव :-**
श्री. ईमरान इब्राहीम शेख
सदनिका क्र. 303-ओ-1
सेक्टर 7, शांतीनगर,
मिरारोड (पू.)

पोच 6/3/18
लिपिक
नगररचना विभाग
मि. भा. म. न. पा.

Imran

pc 2\\User001\d\Mahiti Adhikar\Letter - Imran Shekh.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. १५/१०/२०१५

**प्रकरण क्र (१०६) - मिरा भाईंदर शहराची विकास योजना सुधारीत करणेबाबत इरादा जाहीर करणे.**

**ठराव क्र. (७६) -**

मिरा भाईंदर, नगरपरिषदेची स्थापना दि.१२ जून, १९८५ रोजी झालेली असून दि.२८ फेब्रुवारी २००२ रोजी नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेमध्ये झालेले आहे. शहराचे एकूण क्षेत्र ७९.४० चौ.कि.मी. आहे.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/९६/युडी-१२, दि.१४/०५/९७ अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.१५/०७/९७ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९८/९४१/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

महानगरपालिका क्षेत्रातील मोर्वा, डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या महसुली गावासाठी दि.०१/१२/२००७ पासून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे व मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने अधिसुचित क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ नुसार (काही भाग वगळून) दि.१३/०५/२०१३ रोजी मंजूर झालेली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ नुसार विकास योजना लागु झालेनंतर किमान २० वर्षाहुन एकदा किंवा शासन निर्देश देईल त्यावेळेस नियोजन प्राधिकरणाने विकास योजना सुधारीत करणे आवश्यक आहे.

नियोजन प्राधिकरणाने विकास योजना तयार करणे व त्यासंबंधी कार्यपध्दती याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये तरतुदी विहीत करण्यात आलेल्या आहेत. या वैधानिक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

अधिनियमाचे कलम ३८ नुसार नियोजन प्राधिकरणाने विकास योजना अंमलात आलेनंतर वीस वर्षातुन किमान एकदा किंवा शासन निर्देश देईल त्यावेळेस आपल्या क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार केली पाहिजे व अधिनियमातील विकास योजना तयार करणेचे कार्यपध्दतीबाबत तरतुद अंतर्भुत असलेले कलम २२ ते ३१ मधील तरतुदी अशी सुधारीत विकास योजना तयार करतांना शक्य तितक्या प्रमाणात लागु राहतील.

कलम २३ नुसार नियोजन प्राधिकरणाने आपल्या क्षेत्राचे सर्वेक्षण करुन विद्यमान जमीन बाबत नकाशा तयार करणेपुर्वी आपल्या ठरावाद्वारे विकास योजना तयार करणे संबंधी इरादा जाहीर केला पाहिजे व अशा ठरावासह विकास योजनेत समाविष्ट करावयाच्या क्षेत्राचे हद्द दर्शविणारा नकाशा शासनाकडे सादर केला पाहिजे. त्याचप्रमाणे नियोजन प्राधिकरणाने इराद्याबाबत आपली अधिसुचना शासन राजपत्र व

एक किंवा अधिक स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन त्याबाबत नागरीकांकडून साठ दिवसांचे आत हरकती सुचना मागविणे आवश्यक आहे.

अधिनियमाच्या वर नमुद तरतुदी विचारात घेवुन महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ व २३(१) मधील तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार करणेसंबंधी इरादा जाहीर करणेसाठी महासभेपुढे खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणून अधिनियमाचे कलम ३८ व २३(१) नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे क्षेत्र वगळून) सुधारीत विकास योजना तयार करणेचा इरादा जाहीर करणेस मान्यता देणे.

२) सुधारीत विकास योजनेत सामाविष्ट करावयाचे क्षेत्राच्या नकाशासह ठराव शासनाकडे सादर करणेस मान्यता देणे.

३) सुधारीत विकास योजना तयार करणेच्या इराद्या संबंधी कलम २३ प्रमाणे शासन राजपत्र व स्थानिक वर्तमानपत्रात सुचना प्रसिध्द करुन नागरीकांकडून हरकती व सुचना मागविणे.

तसेच कलम २४ प्रमाणे उक्त क्षेत्राचे सर्व्हेक्षण करणे, विद्यमान जमीन वापर नकाशा (ELU) तयार करणे व त्या क्षेत्रासाठी विकास योजनेचे प्रस्ताव तयार करुन महानगरपालिकेकडे सादर करण्यासाठी नगररचना अधिकारी (TPO) नियुक्त करणे.

वरीलप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ व २३(१) मधील तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सुधारीत विकास योजना तयार करणेसंबंधी इरादा जाहीर करणेसाठी ही महासभा मंजूरी देत आहे.

तसेच विकास योजनेमध्ये सामाविष्ट करावयाच्या आरक्षणाबाबत "ज" च्या प्रस्तावानुसारचा दि.१५/०१/२०१५ रोजीच्या महासभेने पारित केलेला ठराव क्र. ६४ मधील मौजे भाईंदर सर्व्हे क्र.४७४, ४७७, ४८१, ४८७ या जागेत प्ले ग्राऊंड, मार्केट हे आरक्षण राखीव ठेवणेबाबतचा ठराव रद्द करण्यात येत असून सदरच्या जागेमध्ये उपलब्ध चटई क्षेत्राप्रमाणे प्रशासकिय इमारत जागा मालकाकडुन विनामुल्य बांधून घेण्यासाठी ही महासभा मंजूरी देत आहे.

सुचक - नरेंद्र एल. मेहता

अनुमोदक - प्रशांत केळुसकर

ठराव मंजूर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०१/२०१६

**प्रकरण क्रमांक १३२ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिकेची विकास योजना सुधारित करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये नगररचना अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत.**

**ठराव क्रमांक** १०० **:-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ नुसार सुधारीत करण्याबाबत मा. महासभा ठराव क्र. ७६, दि. १५/१०/२०१५ अन्वये मंजूरी दिलेली असून कलम २३(१) नुसार तसा इरादा जाहिर केल्यासंबंधी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करुन शासन राजपत्रासाठी पाठविलेली आहे.

नियोजन प्राधिकरण म्हणून मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सुधारीत विकास योजना तयार करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ प्रमाणे "नगररचना अधिकारी" ची नेमणूक करण्याचा ठराव करणे आवश्यक आहे. सबब शासनाकडून प्रतिनियुक्तीवर असलेले महानगरपालिकेचे विद्यमान नगररचनाकार यांना शासनाच्या पुर्वमंजूरीने "नगररचना अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यासाठी ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर** **अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | नरेंद्र एल. मेहता | १ | प्रभात प्रकाश पाटील | १ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा |
| २ | शरद केशव पाटील | २ | पाटील सुनिता कैलास | २ | ध्रुवकिशोर पाटील |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | झिनत रऊफ कुरेशी | ३ | डिमेलो बर्नड अल्बर्ट |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | विराणी रेखा अनिल | ४ | ग्रिटा स्टिफन फॅरो |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | पुजारी कांचना शेखर | ५ | असेन्ला मेन्डोंसा परेरा |
| ६ | मिरादेवी रामलाल यादव | ६ | पिसाळ मनिषा नामदेव | ६ | शिल्पा भावसार |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | डिसा मर्लिन मर्विन | ७ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | काझी रशीदा जमील | ८ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | इनामदार जुबेर | ९ | दक्षता राजेंद्र ठाकूर |
| १० | जैन गिता भरत | १० | वेतोसकर राजेश शंकर | १० | पाटील वंदना विकास |
| ११ | अरोरा दिपीका पंकज | ११ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ११ | शबनम लियाकत शेख |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | सामंत प्रमोद जयराम | १२ | वंदना रामदास चक्रे |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | १३ | अनिता जयवंत पाटील |
| १४ | मेघना दिपक रावल | | | १४ | गोविंद हेलन जॉर्जी |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | | | १५ | खण्डेलवाल सुरेश |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | | | १६ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा |
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | १७ | मेन्डोंसा स्टिवन जॉन |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | | | १८ | डॉ. आसिफ शेख |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | | | १९ | नरेश तुकाराम पाटील |
| २० | अनिल बाबुराव भोसले | | | २० | भोईर कमलेश यशवंत |
| २१ | कासोदरीया अश्विन श्यामजी | | | २१ | रविंद्र भिमदेव माळी |
| २२ | जैन दिनेश तेजराज | | | २२ | वंदना मंगेश पाटील |
| २३ | जैन रमेश धरमचंद | | | २३ | अशोक तिवारी |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | | | | |
| २५ | तारा विनायक घरत | | | | |
| २६ | जयमाला किशोर पाटील | | | | |
| २७ | परमार अनिता भरत | | | | |
| २८ | पाटील प्रणाली संदिप | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २९ | गावंड मंदाकिणी आत्माराम | | | | |
| ३० | संध्या प्रफुल्ल पाटील | | | | |
| ३१ | म्हात्रे प्रभाकर प्रद्माकर | | | | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | | |
| ३३ | शाह राकेश रतिशचंद्र | | | | |
| ३४ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | | |
| ३५ | केळुसकर प्रशांत नारायण | | | | |
| ३६ | भोईर भावना राजू | | | | |
| ३७ | भोईर राजू यशवंत | | | | |
| ३८ | जाधव मोहन महादेव | | | | |
| ३९ | मुन्ना सिंग | | | | |
| ४० | मयेकर सरस्वती रजनीकांत | | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**